# Eknath Maharaj Haripath । *सार्थ श्री एकनाथ हरिपाठ*

*अभंग*

*- १ -*

*हरिचिया दासा हरि दाही दिशा । भावे जैसा तैसा हरी एक ॥*

*हरी मुखी गातां हरपली चिंता । त्या नाही मागुता जन्म घेणे ॥*

*जन्म घेणे लागे वासनेच्या संगे । तेचि झाली अंगे हरिरूप ॥*

*हरिरूप झाले जाणीव हरपले । मी तूं पण गेले हरिचे ठायी ॥*

*हरिरूप ध्यानी हरिरूप मनी । एका जनार्दनी हरि बोला ॥*

*- २ -*

*हरि बोला हरि बोला नातरि अबोला । व्यर्थ गलबला करूं नका ॥*

*नको अभिमान नको नको मान । सोडी मी तूंपण तोचि सुखी ॥*

*सुखी त्याने व्हावे जगा निववावे । अज्ञानी लावावे सन्मार्गासी ॥*

*मार्ग जया कळे भक्ति भाव बळे । जगाचिये मेळे न दिसती ॥*

*दिसती जनी वनी प्रत्यक्ष लोचनी । एका जनार्दनी ओळखिले ॥*

*- ३ -*

*ओळखिला हरि धन्य तो संसारी । मोक्ष त्यांचे घरी सिद्धिसहित ॥*

*सिद्धी लावी पिसे कोण तया पुसे । नेले राजहंसे पाणी काय ॥*

*काय ते करावे संदेही निर्गुण । ज्ञानाने सगुण ओस केले ॥*

*केले कर्म झाले ते निवांतचि ठेले । उपजले मेले ऐसे किती ॥*

*एका जनार्दनी नाही यातायाती । सुखाची विश्रांती हरिसंगे ॥*

- ४ -

जे जे दृष्टि दिसे ते ते हरिरूप । पूजा ध्यान जप त्यासी नाही ॥

वैकुंठ कैलासी तीर्थ क्षेत्री देव । तयावीण ठाव रिता कोठे ॥

वैष्णवांचे गुह्य मोक्षाचा एकांत । अनंतासी अंत पाहता नाही ॥

आदी मध्य अंत अवघा हरि एक । एकचि अनेक हरि करी ॥

एकाकार झाले जीव दोन्ही तिन्ही । एका जनार्दनी ऐसे केले ॥

- ५ -

नामाविण मुख सर्पाचे ते बीळ । जिव्हा नव्हे काळ सर्प आहे ॥

वाचा नव्हे लांब जळो तयाचे जिणें । यातना भोगणे यमपूरी ॥

हरिविण कोणी नाही सोडविता । पुत्र बंधु कांता संपत्तीचे ॥

अंतकाळी कोणी नाहि रे संगती । साधूचे संगती हरि जोडे ॥

कोटे कुळे तारी हरि अक्षरे दोन्ही । एका जनार्दनी पाठ केली ॥

- ६ -

धन्य माय व्याली सुकृत्ताचे फळ । ते निर्मळ हरिवीण ॥

वेदातांचे बीज हरि हरि अक्षरे । पवित्र सोपारे हेचि एक ॥

योग याग व्रत नेम दान धर्म । नलगे साधन जपता हरि ॥

साधनांचे सार नाम मुखी गातां । हरि हरि म्हणता कार्यसिद्धी ॥

नित्य मुक्त तोचि एक ब्रह्मज्ञानी । एका जनार्दनी हरि बोला ॥

- ७ -

बहुतां सुकृते नरदेह लाभला । भक्तिवीण गेला अधोगती ॥

*पाप भाग्य कैसे न सरेचि कर्म । नकळेचि वर्ग अरे मूढा ॥*

*अनंत जन्मीचे सुकृत पदरी । त्याचे सुखी हरि पेठा होय ॥*

*रावरंक हो कां उच नीच याती । भक्तीवीण माती मुखी त्याच्या ॥*

*एका जनार्दनी हरि हरि म्हणतां । मुक्ति सायुज्यता पाठी लागे ॥*

*- ८ -*

*हरिनामामृत सेवी सावकास । मोक्ष त्यांचे भूत दृष्टी पुढे ॥*

*नित्य नाम घोष जयाचे मंदिरी । तेचि काशीपुरी तीर्थ क्षेत्र ॥*

*वाराणशी तीर्थक्षेत्रा नाश आहे । अविनाशासी पाहे नाश कैचा ॥*

*एका तासामाजी कोटि वेळां सृष्टी । होती जाती दृष्टी पाहे तिची ॥*

*एका जनार्दनी ऐसे किती झाले । हरिनाम सेविले तोचि धन्य ॥*

*- ९ -*

*भक्तीविण पशु कशासी वाढला । सटवीने नेला कैसा नाही ॥*

*काय माय गेली होती भुतापाशी । हरि नये मुखासी अरे मूढा ॥*

*पातके करितां पुढे आहे पुसता । काय उत्तर देता होशील तू ॥*

*अनेक यातना यम करवील । कोण सोडवील तेथे तुजला ॥*

*एका जनार्दनी सांगता हे तोंडे । अहा वाचा रडे बोलताची ॥*

*- १० -*

*स्वहिता कारणें संगती साधूची । भावे भक्ति हरिची भेटी तेणे ॥*

*हरि तेथे संत संत तेथे हरि । ऐसे वेद चारी बोलताती ॥*

*ब्रह्म डोळसाते वेदार्थ ना कळे । तेथे हे आंधळे व्यर्थ होती ॥*

*वेदार्थांचा गोवा कन्या अभिलाषे । वेदे नाही ऐसे सांगितले ॥*

*वेदाची ही बीजाक्षरे हरि दोनी । एका जनार्दनी हरि बोला ॥*

*- ११ -*

*सत्पद हे ब्रह्म चित्पद ते माया । आनंदपदी जया म्हणती हरि ॥*

*सत्पद निर्गुण चित्पद सगुण । सगुणनिर्गुण हरिपायी ॥*

*तत्सदिति ऐसे पैल वस्तूवरी । गीतेमाजी हरि बोलीयेले ॥*

*हरिपद प्राप्ती भोळ्या भाविकासी । अभिमानीयेसी नर्कवास ॥*

*अस्ति भाति प्रिय तैसी पदे तिनी । एका जनार्दनी तेचि झाले ॥*

*- १२ -*

*नाकळे ते कळे कळे ते नाकळे । वळे ते ना वळे गुरुविणे ॥*

*निर्गुणी पावले सगुणी भजता । विकल्प झडता जिव्हा झडे ॥*

*बहुरूपी धरी संन्याशाचा वेष । पाहोन तयास धन देती ॥*

*संन्याशाला नाही दिले बहुरूपी याला । सगुणी भजला तेथे पावे ॥*

*अद्वैताचे खेळ दिसे गुणागुणी । एका जनार्दनी ओळखिले ॥*

*- १३ -*

*ओळखिला हरि साठविला पोटी । होता त्याची भेटी दुःख कैचे ॥*

*नर अथवा नारी हो कां दुराचारी । मुखी गाता हरि पवित्र तो ॥*

*पवित्र ते कुळ धन्य त्याची माय । हरि मुखे गाय नित्य नेमे ॥*

*काम क्रोध लोभ जयाचे अंतरी । नाही अधिकारी ऐसा येथे ॥*

*वैष्णवांचे गुह्य काढिले निवडुनि । एका जनार्दनी हरि बोला ॥*

- १४ -

हरि बोला देता हरि बोला घेता । हसता खेळता हरि बोला ॥

हरि बोला गाता हरि बोला खाता । सर्व कार्य करिता हरि बोला ॥

हरि बोला एकांती हरि बोला लोकांती । देहत्यागा अंती हरि बोला ॥

हरि बोला भांडता हरि बोला कांडता । उठता बैसता हरि बोला ॥

हरि बोला जनी हरि बोला विजनी । एका जनार्दनी हरि बोला ॥

- १५ -

एक तीन पाच मेळा पंचविसावा । छत्तीस तत्त्वांचा मूळ हरि ॥

कल्पना अविद्या तेणे झाला जीव । मायोपाधी शिव बोलीजे ती ॥

जीव शिव दोन्ही हरिरूपी तरंग । सिंधु तो अभंग जेणे हरि ॥

शुक्तिवरी रजत पाहता डोळा दिसे । रज्जुवरी भासे मिथ्या सर्प ॥

क्षेत्र क्षेत्रज्ञाते जाण साती ज्ञानी । एका जनार्दनी हरि बोला ॥

- १६ -

कल्पनेपासूनी कल्पिला जो ठेवा । तेणे पडे गोवा नेणे हरि ॥

दिल्या वांचुनि फळप्राप्ती कैची । इच्छा कल्पनेचि व्यर्थ बापा ॥

इच्छावे ते जवळी हरिचे चरण । सर्व नारायण देतो तुज ॥

न सुटे कल्पना अभिमानाची गांठी । घेता जन्म कोटी हरि कैचा ॥

एका जनार्दनी सापडली खूण । कल्पना अभिमान हरि झाला ॥

- १७ -

काय पद्मिनीचे षंढासी सोहाळे । वांझेसी डोहाळे कैसी होती ॥

अंधापुढे दीप खरासी चंदन । सर्पासी दुग्धपान करू नये ॥

क्रोधी अविश्वासी त्यांसी बोध कैचा । व्यर्थ आपुली वाचा शिणनूं नको ॥

खळासी संगति उपयोगासी नये । आपणा अपाय त्याचे संगे ॥

वैष्णवी कुपथ्य टाकिलें वाळूनि । एका जनार्दनी तेचि भले ॥

- १८ -

न जायचि ताठा नित्य खटाटोप । मंडुकी वटवट तैसे ते गा ॥

प्रेमाविना भजन नाकाविण मोती । अर्थाविण पोथी वाचूनि काय ॥

कुंकवा नाही ठाव म्हणे मी आहेव । भावाविण देव कसा पावे ॥

अनुतापावीण भाव कसा राहे । अनुभव पाहे शोधुनिया ॥

पाहता पाहणे गेले ते शोधुनी । एका जनार्दनी अनुभविले ॥

- १९ -

परिमळ गेलिया वोस फुल देठी । आयुष्या शेवटी देह तैसा ॥

घडी घडी काळ वाट पाहे । अजूनि किती आहे अवकाश ॥

हाचि अनुताप घेऊनी साधन । काही तरी बोध करी मना ॥

एक तास उरला खट्वांगरायासी । भाग्यदशा कैची प्राप्त झाली ॥

सापडला हरि तयाला साधनी । एका जनार्दनी हरि बोला ॥

- २० -

करारे बापांनो साधन हरीचे । झणी करणीचे करूं नका ॥

जेणे नये जन्म यमाची यातना । ऐसिया साधन करा काही ॥

साधनाचे सार मंत्रबीज हरी । आत्मततत्त्व धरी तोचि एक ॥

*कोटि कोटि यज्ञ नित्य ज्याचा नेम । एक हरिनाम जपता घडे ॥*

*एका जनार्दनी न घ्यावा संशय । निश्चयेसी होय हरिरूप ॥*

*- २१ -*

*बारा जणी हरिसी नेणती । म्हणोनि फिरती रात्रंदिवस ॥*

*सहस्त्र मुखांचा वर्णिता भागला हर्ष जया झाला तेणे सुखे ॥*

*वेद जाणूं गेला पुढे मौनावला । ते गुह्य तुजला प्राप्त कैचे ॥*

*पूर्व सुकृताचा पूर्ण अभ्यासाचा । दास सद्गुरूचा तोचि जाणे ॥*

*जाणते नेणते हरिचे ठिकाणी एका जनार्दनी हरि बोला ॥*

*- २२-*

*पिंड देह स्थिती ब्रह्मांडी पसारा । हरिवीण सारा व्यर्थ भ्रम ॥*

*शुक याज्ञावल्क्य दत्त कपिल मुनी । हरिसी जाणून हरिच झाले ॥*

*यारे यारे धरूं हरिनाम तारूं । भवाचा सागरू भय नाही ॥*

*साधुसंत गेले आनंदी राहिले । हरिनामे झाले कृतकृत्य ॥*

*एका जनार्दनी मांडिले दुकान । देतो मोलाविण सर्ववस्तू ॥*

*- २३ -*

*आवडीन भावे हरिनाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे ॥*

*नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा । पति तो लक्ष्मीचा जाणतसे ॥*

*सकळ जीवांचा करितो सांभाळ । तुज मोकलील ऐसे नाही ॥*

*जैसी स्थिती आहे तैशापरी राहे । कौतुक तूं पाहे संचिताचे ॥*

*एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा । हरिकृपे त्याचा नाश झाला ॥*

- २४ -

दुर्बळाची कन्या समर्थाने केली । अवदसा निघाली दरिद्राची ॥

हरि कृपा होता भक्तां निघती दोंदे । नाचती स्वानंदे हरिरंगी ॥

देव भक्त दोन्ही एकरूप झाले । मुळीचे संचले जैसे तैसे ॥

पाजळली ज्योति कापुराची वाती । ओवाळितां आरती भेद नुरे ॥

एका जनार्दनी कल्पचि मुरला। तोचि हरि झाला ब्रह्मरूप ॥

- २५ -

पांची मुद्रा लावी लावुनिया लक्ष । तो आत्मा प्रत्यक्ष हरि दिसे ॥

कानी जे पेरिले डोळा उगवले । व्यापक भरले तोचि हरि ॥

कर्म उपासना ज्ञानमार्गी झाले । हरिपाठ आले सर्व मार्ग ॥

नित्य प्रेमभावे परिपाठ गाय । हरिकृपा होईल तयावरी ॥

झाला हरिपाठ बोलणे येथूनि एका जनार्दनी हरि बोला ॥

सार्थ श्री एकनाथ हरिपाठ समाप्त